(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग-६अ करिता)

क्र. पोमसं३-अ/रापोउपनि-पोनि-पदो/२०१६.

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
**शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,**
**मुंबई- ४०० ००१.**
दिनांक :- १३/०१/२०१६.

**वाचा:-** १ गृहविभागाचे अर्धशासकीय पत्र क्र.पीएम्एन्-०१०९/क्र.५१५/पोल ५-ब, दिनांक ०६/०७/२००९
२ शासन पत्र गृहविभाग, क्र.पीएम्एन्-०१०९/प्र.क्र.५१५/पोल ५ब, दि.१०/८/२००९ व
३ सन २०१४, महाराष्ट्र अधिनियम क्र.१४, दिनांक २५ जून २०१४ व सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.११, दि.६ एप्रिल २०१५

## आदेश

उपरोक्त संदर्भ क्र.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे,महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ न चे पोट कलम (२) व त्याखालील सुधारीत स्पष्टीकरणानुसार पोलीस आस्थापना मंडळ क्रमांक २ यांना प्रदान असलेल्या अधिकाराचा वापर करुन, खालील नमूद केलेल्या राखीव पोलीस उपनिरीक्षक यांना त्यांनी कार्यभार ग्रहण केलेल्या दिनांकापासून राखीव पोलीस निरीक्षक पदावर खालील अटींच्या अधिन राहून **तात्पुरत्या स्वरूपात** पदोन्नती देण्यात येत असून, सदर पदोन्नतीवर त्यांची पदस्थापना त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या रकाना क्र.४ मधील घटकात करण्यात येत आहे:-

| अ.क्र | राखीव पोलीस उपनिरीक्षक यांचे नाव | सध्याची नेमणूक | राखीव पोलीस निरीक्षक पदावर तात्पुरत्या स्वरुपात दिलेल्या पदोन्नतीवरील नेमणूक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | संजय यशवंत सावंत | पोलीस अधीक्षक, बीड | पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई | शासन परिपत्रक, सा.प्र.वि., दि.२२/०४/१९९६ मधील तरतुदींनुसार श्री. सावंत यांच्याविरुध्द सुरु असलेल्या विभागीय चौकशीच्या अनुषंगाने शिक्षा झाल्यास सदर शिक्षा वरिष्ठ पदात भोगण्याच्या अधीन राहून |

२. उपरोक्त राखीव पोलीस उपनिरीक्षक यांना पदोन्नतीच्या घटकात हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे, व त्यांना कार्यमुक्त केल्याचा दिनांक त्याच दिवशी हया कार्यालयास कळवावा. तसेच, ते पदोन्नतीच्या ठिकाणी हजर होताच, त्यांनी राखीव पोलीस निरीक्षक पदाचा कार्यभार स्विकारल्याचा दिनांक सुध्दा संबंधीत घटक प्रमुखांनी विनाविलंब ह्या कर्यालयास कळवावा.

३. सदर राखीव पोलीस उपनिरीक्षक यांना देण्यात आलेली राखीव पोलीस निरीक्षक पदावरील <u>तात्पुरती पदोन्नती</u> ही खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे:-

**अ)** सदर पदोन्नती प्रथम ११ महिने, किंवा शासन व महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेकडून निवडसूचीस मान्यता मिळेपर्यंत, यापैकी जे आगोदर घडेल त्या कालावधीकरिता असेल.

**ब)** सदर तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधीत राखीव पोलीस उपनिरीक्षक यांना नियमीत पदोन्नतीचे, म्हणजे सेवाज्येष्ठतेचे कोणतेही अधिकार प्राप्त होणार नाही.

४. **वर नमुद केलेल्या तात्पुरत्या पदोन्नतीच्या आदेशाधिन असलेल्या पोलीस उपनिरीक्षकांविरुध्द आता गुन्हा दाखल झाला असेल / निलंबनाची कारवाई केली असेल / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असेल, किंवा ते एखादी शिक्षा भोगत असतील तर, संबंधीत घटक प्रमुखांनी त्यांना <u>पदोन्नतीवर न सोडता त्यांच्या विरूध्दच्या प्रकरणाची</u> सविस्तर माहिती या कार्यालयास फॅक्सव्दारे तात्काळ पाठवावी, व पुढील आदेशाची वाट पहावी.**

५. उपरोक्त आदेशात नमुद केलेल्या राखीव पोलीस उपनिरीक्षकांविरूध्द विभागीय चौकशी प्रलंबित आहे, अथवा विभागीय चौकशीत निर्गमीत केलेल्या सौम्य शिक्षेची अंमलबजावणी अद्याप सुरू झालेली नाही, अशा राखीव पोलीस उपनिरीक्षकांकडून त्यांना भविष्यात होणारी शिक्षा ते पदोन्नतीच्या पदात भोगण्यास तयार असल्याबाबतचे त्यांच्याकडून दिनांकित स्वाक्षरी केलेले **लेखी हमीपत्र घेऊन व त्यास अधिन राहूनच,** त्यांना पदोन्नतीवर सोडण्यात यावे. तसेच संबंधीत राखीव पोलीस उपनिरीक्षक यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त केलेल्या आदेशांतही तसा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. सदर आदेशाची व त्यांच्या लेखी हमीपत्राची प्रत ह्या कार्यालयातील कार्यासन अधिकारी, १) का.क्र.३-अ २) का.क्र. ११ व ३) का.क्र.११ अ यांना स्वतंत्रपणे लक्षवेध करून, न चुकता सादर करण्यात यावी. तसेच, त्याची प्रत संबंधीत राखीव पोलीस उपनिरीक्षक ज्या घटकात आता पदोन्नतीवर जात आहेत, त्या घटकप्रमुखांना देखील न चुकता पाठवावी. तसा अनुपालन अहवाल या कार्यालयास कार्यासन क्र.३ अ यांना लक्षवेध करून सादर करावा.

६. **तसेच, उपरोक्त आदेशांमधील राखीव पोलीस उपनिरीक्षक जर मागास प्रवर्गातील असतील तर, त्यांच्या जात वैधता प्रमाणपत्राची पडताळणी झालेली असल्याची खातरजमा करूनच, त्यांना पदोन्नतीवर हजर होण्यासाठी कार्यमुक्त करावे. तसेच, ज्या राखीव पोलीस उपनिरीक्षकांची जात प्रमाणपत्राची पडताळणी अद्यापही झालेली नसल्यास, त्या पोलीस उपनिरीक्षक यांना पदोन्नतीवर न सोडता त्यांच्या प्रकरणाची सविस्तर माहिती या कार्यालयास तात्काळ पाठवावी व पुढील आदेशांची वाट पहावी. जात प्रमाणपत्राची वैधता झालेली नसताना पदोन्नती दिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत घटक प्रमुखांची राहील. तसेच, संबंधीत जबाबदार कर्मचारी /अधिकाऱ्याविरुध्द शिस्तभंगविषयक विभागीय कारवाई करण्यात येईल.**

७. मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. ८४५२/२००४ मध्ये दिनांक ०९/३/२००७ रोजी दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने, मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दिनांक २८/३/२००८ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गाच्या आरक्षणाच्या पदावरील सर्व पदोन्नत्या हया मूळ याचिका क्र.८४५२/०४ च्या निर्णयाच्या अधिन राहून करण्यात येत आहेत, तसा स्पष्ट उल्लेख पदोन्नतीच्या आदेशांमध्ये करण्यासंदर्भात, शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/१/१६-ब, दिनांक १/४/२००८ च्या अन्वये शासनाने निर्देश दिलेले आहेत. **मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपिठापुढे दाखल केलेला मूळ अर्ज क्र.११८०/२०१० मध्ये मा. न्यायालयाच्या** अंतिम निर्णयाच्या अधिनस्त राहून संबंधीत राखीव पोलीस उपनिरीक्षक यांना पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात येत आहेत.

८. शासन पत्र, गृहविभाग, क्र.पीएम्एन्-०१०८/प्र.क्र.८८३/पोल ५ ब, दि.२९/७/२००८ मध्ये नमुद केल्यानुसार, शासन निर्णय, गृहविभाग क्र.पीएम्एन्-०२९७/सीआर-४७४/पोल-५ ब, दि.२६/२/२००४ अन्वये महाराष्ट्र पोलीस दलातील त्यावेळी राजपत्रीत "गट ब" असलेल्या पोलीस निरीक्षक पदाचा दर्जा वाढवून ते पद "गट अ" चे करण्यात आले आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद-३२० नुसार राज्य शासनाच्या सेवेतील सर्व राजपत्रीत पदें लोकसेवा आयोगाच्या कक्षेत येतात. याबाबत, आयोगास पाठविण्यात येणाऱ्या प्रस्तावास मिळणाऱ्या मंजुरीच्या अधिन राहून सदर पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

९. **तसेच शासन पत्र, गृहविभाग, क्र.पीएम्एन्-०१०८/प्र.क्र.१३४/पोल-५ ब, दि.२२/१०/२००८ अन्वये पोलीस निरीक्षकांपर्यंतच्या रापत्रीत पदावरील पदोन्नती नियमित करण्याबाबतच्या आदेशांना शासन मान्यतेच्या अधिन राहून पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.**

**१०.** उपरोक्त राखीव पोलीस उपनिरीक्षक यांना पदोन्नतीवर अनावधनाने त्यांच्या मूळ जिल्हयात नेमणूक दिली असल्यास त्यांना पदोन्नतीवर हजर करून न घेता, त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास तात्काळ पाठवावा

११. सदर पदोन्नती आदेशांमधील राखीव पोलीस उपनिरीक्षक हे जर ओदशांमध्ये नमुद केलेल्या घटकांमध्ये सध्या कार्यरत नसतील तर, ते **ज्या घटकात कार्यरत आहेत, त्या घटकप्रमुखांनी** त्यांना पदोन्नतीच्या घटकात हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे व तसे हया कार्यालयास न चुकता कळवावे.

१२. सदर आदेश http://www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर FLASH या शिर्षाखाली देखील उपलब्ध होतील.

१३. **सध्या राज्यात काही ठिकाणी होत असलेल्या नगरपरिषदा / नगरपंचायतीच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने त्यांच्या क्र.रानिआ/नप-२०११/ प्र.क्र.२०/का-०६, दिनांक १/११/२०११ च्या आदेशान्वये दिलेल्या सूचना विचारात घेता संबंधीत घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, त्यांनी संबंधीत राखीव पोलीस उपनिरीक्षक यांना राखीव पोलीस निरीक्षक पदी पदोन्नतीवरील नेमणूकीच्या ठिकाणी कार्यमुक्त / हजर करून घेण्याबाबत आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची दक्षता घेवून, पुढील**

**आवश्यक ती कार्यवाही करावी व त्यांना कार्यमुक्त केल्याचा व ते पदोन्नतीच्या ठिकाणी हजर झाल्याचा दिनांक हया कार्यालयास सत्वर कळवावा.**

**प्रवीण दीक्षित**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,
मुंबई

प्रति,
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
पोलीस अधीक्षक, बीड

प्रत सविनय सादर,
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृहविभाग,
दुसरा मजला, हुतत्मा राजगुरु चौक, मुंबई-३२

प्रत सस्नेह,
महालेखाकार-१ महाराष्ट्र राज्य, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी, बीड

प्रत:- कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.२/ ५-अ/९/११/११-अ/१४-अ/२८/३६ व ४०
पोलीस उपअधीक्षक, संगणक कक्ष, राजय पोलीस मुख्यालय, मुंबई ( सदर आदेश संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी)

**(आशुतोष डुम्बरे)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचेकरिता